**<u>ठळक बातम्या</u>**

- वस्तू आणि सेवा कराचे नवे दर उद्यापासून लागू होणार /यामुळे देशात बचत उत्सव सुरु होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- सायबर सुरक्षेबरोबरच अमली पदार्थ संदर्भातल्या गुन्ह्यांप्रकरणी राज्य शासनाचं 'झिरो टॉलरन्स धोरण' असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- नांदेड, परभणी, सातारा आणि सांगली जिल्ह्यातल्या पूर आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारकडून ६८९ कोटी रुपयांचा मदतनिधी मंजूर

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत सुपर फोर मध्ये आज भारत आणि पाकिस्तान आमनेसामने

**<><><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर रचनेत सुधारणा करण्याचा केंद्रसरकारचा निर्णय उद्यापासून लागू होणार आहे. त्यामुळे अनेक क्षेत्रातल्या उत्पादनांच्या किमतीवर तसंच ग्राहकांवर याचा सकारात्मक परिणाम होणार आहे. जीएसटी पुनर्रचनेचा ऑटोमोबाईल क्षेत्रावर होणारा परिणाम जाणून घेऊ या

***.... होल्ड- व्हॉईस कास्ट- कौस्तुभ- -***

*(नवरात्र किंवा विजयादशमीनिमित्त नवीन वाहन खरेदी करु इच्छिणाऱ्यांना जीएसटी कररचनेतल्या बदलाचा फायदा होणार आहे. नव्या कररचनेनुसार ऑटोमोबाईल क्षेत्रातले जीएसटी दर कमी करण्यात आले आहेत. दुचाकी आणि लहान कारवरील जीएसटी २८ टक्क्यावरून १८ टक्के करण्यात आला आहे. मोठ्या कारवर ४० टक्के जीएसटी आकारला जाईल मात्र या वाहनावरचा उपकर रद्द करण्यात आला आहे. परवडेल अशा दरात ही वाहनं उपलब्ध होतील. अनेक*

*ऑटोमोबाईल कंपन्यांनी नव्या जीएसटी दररचनेनुसार वाहनांचे नवे दर जाहीर केले आहेत. मारुती सुझुकी या कंपनीने आपल्याकडील विविध कारच्या नव्या किमती जाहीर केल्या असून सणासाठी नव्या ऑफरही दिल्या आहेत. एकूणच या निर्णयामुळे ग्राहक आणि व्यावसायिक दोन्ही बाजूने उत्साहाचे वातावरण आहे.*

*किमती कमी झाल्यामुळे  नवी वाहनं बाजारात येतील आणि ऑटोमोबाईल क्षेत्राला चालना मिळेल. याचा थेट फायदा तरुण, व्यावसायिक आणि कनिष्ठ मध्यमवर्गीयांना होणार आहे.)*

**<><><><>**

शारदीय नवरात्रौत्सवाबरोबरच उद्यापासून देशात बचत उत्सव सुरु होत आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं आहे. वस्तू आणि सेवा कररचनेतले बदल उद्यापासून लागू होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी आज राष्ट्राला संबोधित केलं. दैनंदिन गरजेच्या अनेक वस्तू आणि सेवांवरचा कर कमी झाल्यामुळे सर्वांचीच बचत होणार आहे असं ते म्हणाले….

**होल्ड - बाईट- प्रधानमंत्री-**

१२ लाख रुपयेपर्यंतच्या उत्पन्नावर प्राप्तिकर माफ केल्यामुळे आणि जीएसटीतल्या सुधारणांमुळे मिळून करदात्यांची एकूण बचत अडीच लाख कोटी रुपयांची होईल आणि आपली स्वप्न साकार करण्याची संधी मिळेल असं ते म्हणाले. व्यापारी, दुकानदार आणि उद्योजकांनाही या सुधारणांचा फायदा होणार असून त्यांनी हा फायदा ग्राहकांपर्यंत पोहचवावा असं आवाहन त्यांनी केलं. या सुधारणा आत्मनिर्भरतेची वाट सुकर करत असल्याचं सांगत त्यांनी स्वदेशी वापराचं आवाहन नागरिकांना केलं.

"नागरिक देवो भव" हाच आपल्या सरकारच्या प्रशासनाचा मंत्र आहे असं ते म्हणाले.

**<><><><>**

कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीनं देश महासत्तेकडे वाटचाल करू शकतो. त्यामुळे राज्यात पोलीस व्यवस्थेच्या सुधारणांवर भर देण्यात आला असून सायबर सुरक्षेबरोबरच अमली पदार्थ संदर्भातल्या गुन्ह्यांप्रकरणी राज्य शासनानं 'झिरो टॉलरन्स धोरण' अवलंबलं असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. भाजपा युवा मोर्चाच्या 'नमो युवा रन फॉर नशा मुक्त भारत' कार्यक्रमाचा प्रारंभ मुख्यमंत्र्यांनी आज मुंबईत केला, त्यावेळी ते बोलत होते. 'नशामुक्त भारत, नशामुक्त महाराष्ट्र आणि नशामुक्त मुंबई' या संकल्पनेवर आधारित या नमो रन मॅरेथा◌ॅनमुळे आपली तरुणाई देशभक्तीला प्राधान्य देईल तसंच देशाला सर्वोच्च स्थानी नेण्याच्या आणि आत्मनिर्भर करण्याच्या ध्यासानं प्रेरित होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. या कार्यक्रमाला पालक मंत्री मंगलप्रभात लोढा, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, मिलिंद सोमण आदी मान्यवर उपस्थित होते.

सेवा पर्वाचा भाग म्हणून **बीड**मध्ये आयोजित नमो युवा रन या मॅरेथॉन स्पर्धेला भाजपा नेत्या, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी हिरवा झेंडा दाखवला. यावेळी भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी, बीड शहरातील युवकांची मोठ्या संख्येनं उपस्थिती होती.

**<><><><><>**

शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता प्रदान करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारनं अनेक धोरणं आखली. याविषयी सविस्तर जाणून घेऊया....

**व्हीसी**

*(सरकारच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांसाठी निश्चित उत्पन्नाचे स्रोत खुले झाले. त्यांच्या जगण्यातील अस्थिरता संपली. याविषयी प्रधानमंत्री म्हणाले....*

***होल्ड बाईट मोदी***

*२०13-1४ ला शेतकऱ्यांसाठी अर्थसंकल्पातील वाटा २७ हजार कोटी रुपये होता. तो वाढून 1 लाख ३७ हजार कोटी रुपये इतका झाला. पीएम किसान योजनेच्या माध्यमातून अकरा कोटी शेतकऱ्यांना थेट लाभ मिळतो. किसान क्रेडिट कार्ड, पिक विमा योजना यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला असून बाजाराच्या अनिश्चिततेपासून त्याला संरक्षण मिळत आहे.)*

<><><><>

शारदीय नवरात्रौत्सवाला उद्यापासून प्रारंभ होत असून राज्यातल्या देवीच्या साडेतीन शक्तीपीठांसह सर्वच देवी मंदिरांमधे उत्सवाची तयारी उत्साहाने होत आहे. अनेक ठिकाणी सार्वजनिक नवरात्रौत्सवाचं आयोजन करण्यात आलं असून मंडपांमधे माता महिषासुरमर्दिनीच्या मूर्ती विराजमान होत आहेत. तुळजापूरचं तुळजाभवानी मंदिर कोल्हापूरचं महालक्ष्मी मंदिर, नांदेड जिल्हातल्या माहुरचं रेणुका माता मंदिर तसंच वणीच्या सप्तश्रृंगी देवी मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त जय्यत तयारी करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूरच्या एसटी आगारात भाविकांच्या सोयीसाठी पन्नास नव्या बस दाखल होणार आहेत. घटस्थापनेपासून कोजागिरी पौर्णिमेपर्यंत तुळजापूर-सोलापूर, तुळजापूर-धाराशिव, तुळजापूर- लातूर, तुळजापूर-कोल्हापूर आदी मार्गांवर गाड्यांच्या दररोज सुमारे दोनशे फेऱ्या होणार आहेत.

<><><><>

हिन्दी वृत्त वाहिन्यांनी त्यांच्या प्रसारणात उर्दू शब्दांचा जास्त वापर करू नये आणि भाषा तज्ञांची नियुक्ती करावी असे आदेश माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं दिल्याच्या बातमीचं सरकारनं खंडन केलं आहे. मंत्रालयानं कोणत्याही वाहिन्यांना असे निर्देश दिले नसून हा दावा दिशाभूल करणारा असल्याचं पत्र सूचना कार्यालयाच्या सत्य शोधन विभागानं म्हटलं आहे. नागरिकांनी अचूक माहितीसाठी अधिकृत स्त्रोतांवर भरवसा ठेवावा, असं आवाहन कार्यालयानं केलं आहे.

<><><><>

गडचिरोली जिल्ह्यात हालूर गावात महिलांच्या पुढाकारानं सर्व ग्रामस्थांनी मिळून गावात दारुबंदीचा ठराव मंजूर केला. व्यसनमुक्ती क्षेत्रात काम करणाऱ्या लॉईड्स इन्फिनिट फाउंडेशनच्या पाठिंब्यानं गावाच्या समग्र विकासासाठी गावातल्या महिलांनी हे ऐतिहासिक पाऊल उचललं.

<><><><>

नांदेड, परभणी, सातारा आणि सांगली जिल्ह्यातल्या पूर आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी नुकसानभरपाई म्हणून राज्य सरकारनं ६८९ कोटी रुपयांचा मदतनिधी मंजूर केला आहे. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी आज ही घोषणा केली. जून ते ऑगस्ट २०२५ या काळात अतिवृष्टीनं बाधित या चार जिल्ह्यांमध्ये सरकारी यंत्रणेने तातडीनं पंचनामे करून अहवाल पाठवल्यामुळे ही मदत त्वरित मंजूर केल्याचं जाधव पाटील म्हणाले.

या मदतीचं वाटप करताना शेतकऱ्यांच्या पूर्वीच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी मदतनिधीचा वापर करू नये आणि मंजूर केलेला सर्व निधी शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात द्यावा अशा सूचना बँकांना दिल्या असल्याचंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

<><><><>

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे सुरू असून शेतकऱ्यांना मदत दिली जाणार असल्याचं मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितलं. अतिवृष्टी झाल्यामुळे जसं नुकसान झालं आहे तसं जिथं पाऊस कमी पडला आहे तिथंही पिकांचं नुकसान झालं आहे, त्याचेही पंचनामे केले जातील असं मुंडे म्हणाल्या. नदीपात्रात अतिक्रमण केल्याप्रकरणी सर्वेक्षण करण्याच्या सूचना मुंडे यांनी प्रशासनाला दिल्या.

<><><><>

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर फोर मध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान सामना होणार आहे. दुबईत भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता या सामन्याला सुरुवात होईल. भारतीय संघानं या स्पर्धेत पाकिस्तानविरुद्धच्या या आधीच्या सामन्यात सहज विजय नोंदवला आहे. हा सामना जिंकल्यास भारताला थेट अंतिम सामन्यात प्रवेश मिळेल. अंतिम सामना येत्या २८ डिसेंबरला होणार आहे. सुपर फोर गटामध्ये काल झालेल्या पहिल्या सामन्यात बांगलादेशच्या संघानं श्रीलंकेवर विजय मिळवला.

**<><><><><>**

चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत सात्विक साईराज रांकिरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीला उपविजेतेपदावर समाधन मानावं लागलं. शेनझेन इथं आज अंतिम सामन्यात किम वॉन हो आणि सेओ सेउंग जे या कोरियाच्या जोडीनं त्यांचा २१-१९, २१-१५ असा पराभव केला.

**<><><><><>**

H1B व्हिसासाठी १ लाख डॉलर आकारण्याच्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेनंतर तातडीच्या मदतीची गरज असलेल्या भारतीयांसाठी अमेरिकेतल्या भारतीय दुतावासानं आपत्कालीन मदत क्रमांक जाहीर केला आहे.

H 1B व्हिसासाठीची शुल्कवाढ ही फक्त नव्या अर्जदारांसाठी असून ही रक्कम फक्त एकदाच भरायची आहे, असं अमेरिकेतल्या व्हाईट हाऊसच्या माध्यम प्रवक्ता केरोलीन लीविट यांनी काल प्रसिद्ध केलेल्या निवेदनात स्पष्ट केलं. H 1B व्हिसाचं शुल्क दोन ते पाच हजार अमेरिकन डॉलरवरून वाढवून ते १ लाख डॉलर करण्याच्या निर्णयामुळे अनेक कुटुंबांना फटका बसणार असून अमेरिकन प्रशासनानं याचा विचार करावा, अशी प्रतिक्रिया भारतानं दिली होती. त्यानंतर अमेरिकेचं हे स्पष्टीकरण आलं आहे. जे H 1B व्हिसाधारक सध्या अमेरिकेबाहेर आहेत त्यांना एक लाख डॉलर भरण्याची आवश्यकता नाही, तसंच व्हिसाचं नूतनीकरण

करण्यातही या निर्णयामुळे अडचण येणार नाही, असं लीविट यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे सांगितलं.

<><><><>

लातूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. निलंगा तालुक्यातल्या काटेजवळगा, केदारपूर परिसरात ओढ्याला आलेल्या पुरात आज सकाळी दोघे जण वाहून गेले. तर सांगवी इथं वीज पडून एका महिलेचा मृत्यू झाला.  दरम्यान, मांजरा धरणाचे ४ दरवाजे उघडण्यात आले असून नदीकाठाच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

<><><><>

जगभरात आज ‘अल्झायमर्स दिना’ निमित्त विविध कार्यक्रम होत आहेत. अल्झायमर्सचं लौकर निदान, तसंच योग्य उपचारांच्या दृष्टीनं  या विषयी जनजागृती महत्त्वाची असल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं ३० आणि ३१ ऑक्टोबरला भारत आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषद २०२५ आयोजित केली आहे. शेती हा भारतीय संस्कृतीचा आत्मा असून तांदूळ उत्पादन हा भारतीय शेतकऱ्यांचा अभिमान असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आपल्या व्हिडिओ संदेशात म्हटलं आहे. कृषि आधारित निर्यात पुढील ५ वर्षात दुप्पट होण्यासाठी ही परिषद महत्वाची ठरेल, असं ते म्हणाले.

<><><><>

सोलापूर जिल्ह्यात उत्तर सोलापूर तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी उत्तर सोलापूर काँग्रेस कमिटीनं केली आहे. खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काल शेतीच्या बांधावर जाऊन निदर्शनं करण्यात आली .

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करावेत, एकरी ५० हजार रुपये मदत द्यावी, तसेच रब्बी हंगामासाठी बियाणं आणि खतं उपलब्ध करून द्यावीत अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात कोकण आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्र काही ठिकाणी तर विदर्भात तुरळक पाऊस पडला.

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

येत्या २६ तारखेपर्यंत राज्याच्या चारही विभागांमध्ये कमी-अधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. येत्या दोन दिवसात चारही विभागांमध्ये काही ठिकाणी तर बुधवारपासून अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधे पुढच्या वर्षी विधानसभा निवडणूक होणार असून त्या दृष्टीनं राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी मतदान केंद्रांसंबंधीच्या माहितीचं संकलन सुरु केलं आहे. या निवडणुकीत केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार कोणत्याही मतदान केंद्रावर बाराशेपेक्षा जास्त मतदार नसतील. त्यामुळे मतदान केंद्रांची संख्या वाढवण्यात येईल. या माहितीसंकलनात मतदान केंद्रावरच्या सोयी सुविधांप्रमाणेच मतदारांच्या घरांपासूनचं अंतरही नोंदण्यात येणार आहे.

**//<><><><><><>//**